प्रेस नोट १८ दिनांक २४/०९/२०२४

## देवनार पोलीसांनी अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचा ६ तासाच्या आत शोध घेतलेबाबत...

दिनांक २३/०९/२०२४ रोजी देवनार पोलीस ठाणेस फिर्यादी यांनी त्यांच्या अडीच वर्षाच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार पोलीस ठाणेस दिल्याने कलम १४०(१), ३५२, ३५१(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे नेतृत्वामध्ये दोन पोलीस पथके तयार करण्यात आली. सदर पथकांनी गोपनीय व तांत्रिक माहिती प्राप्त करून त्याचा योग्य समन्वय साधत सहा तासाचे आत आरोपीचा मुंबई, नवी मुंबई, ठाणे परिसरात पाठलाग करीत आरोपीतास मुंब्रा येथून ताब्यात घेतले. त्याचेकडे अपहृत अल्पवयीन मुलाची चौकशी करून त्यास नवीन पनवेल येथून सुखरूप ताब्यात घेतले. गुन्हयाचा पुढील तपास पोउनि कोरडे करीत आहेत.

सदर उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, डॉ. श्री. महेश पाटील, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, श्री. हेमराजसिंह राजपूत, सहायक पोलीस आयुक्त, देवनार विभाग, श्री. संजय डहाके यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देवनार पोलीस ठाणे श्री बासितअली सय्यद, पोलीस निरीक्षक सुनिल घोसाळकर, पोउनि देशमुख, साळुंखे, सफौ कांबळे, पोशि देशमुख, मपोशि फापाळे यांनी केली आहे.

-------------------